Organized by DSO Yavatmal

# NATIONAL SPORTS DAY

Webinar On the occasion of Birth Anniversary of Hockey Legend Major Dhyan Chand

Topic - Fitness for Sports and Academic Excellence


**FREE ENTRY** | **29 August** 3 PM TO 5 PM



Dr Uday Navalekar



**Hon Omprakash Bakoriya**
Commisioner



**Ganesh Jadhao**
Dy Dir Amt Reg



**Mr Mushtak Ahmad**
DSO Yavatmal



**Sachin Milmile**
Cricket Coach

+917020480090

Live on Zoom

Scanned by Scanner Go

# ारवेकर महाविद्यालयात ऑनलाईन आभासी चर्चा

**यवतमाळ, २ सप्टेंबर**

स्थानिक आबासाहेब पारवेकर ाविद्यालय व यवतमाळ जिल्हा डा विभाग यांच्या संयुक्त द्यमाने भारतीय हॉकीचे जादुगार र ध्यानचंद यांच्या जयंती व ट्रीय क्रीडा दिनानिमित्त ऑनलाईन संवादाचे आयोजन करण्यात ले होते. यामध्ये मुख्य मार्गदर्शक णून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. य नावलेकर होते. तर प्रमुख स्थिती जिल्हा क्रीडा अधिकारी ताक अहमद व क्रिकेट प्रशिक्षक चेन मिलमिले यांची ती. ऑनलाईन वेब संवादामध्ये वातीला मार्गदर्शन करताना ार्य डॉ. नावलेकर यांनी, भारतीय कीचे जादुगार मेजर ध्यानचंद च्या जीवनकार्यावर प्रकाश कला. तसेच आजकालचे पालक ांना मैदानी खेळ खेळू न देता क्त पुस्तकी अभ्यासावरच जास्त र देतात. त्यामुळे मुलांच्या चौफेर कासावर मर्यादा येत असल्याचे नी सांगितले.



उदय नावलेकर

पुढे बोलताना त्यांनी यवतमाळातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा क्षेत्रात ठसा उमटविणाऱ्या खेळाडूंना प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून बोलते केले. पारवेकर महाविद्यालयाचे विद्यार्थी व भारतीय हॉकी संघाचे गोलरक्षक, 'बेस्ट गोलकीपर इन आशिया' पुरस्कारप्राप्त आकाश चिकटे यांनी डॉ. नावलेकर यांच्या प्रश्नांना उत्तरे देताना भारतीय हॉकी संघात निवड होईपर्यंतच्या संघर्षमय प्रवासाचे वर्णन केले. महाविद्यालायाचा दुसरा विद्यार्थी आणि नुकत्याच जाहीर झालेल्या यूपीएससी निकालामध्ये भारतातून ३१५ वा क्रमांक प्राप्त करून भारतीय नागरी सेवेमध्ये दाखल होणार असलेल्या अझरुद्दीन काझी यांनीसुद्धा महाविद्यालयीन जीवनात राष्ट्रीय स्तरावर हँडबॉल खेळाडू म्हणून आपले व महाविद्यालयाचे नाव केले होते. ते म्हणाले, मैदानी खेळ खेळल्यामुळे अभ्यासमध्ये एकाग्रता निर्माण होते. म्हणून यूपीएससीसारख्या कठीण समजल्या जाणाऱ्या परीक्षेची तयारी करताना खेळाचीसुद्धा मदत झाली. या वेब संवादामध्ये महाविद्यालयाची विद्यार्थिनी आणि 'खेलो इंडिया' मध्ये सहभाग नोंदविणाऱ्या तसेच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या महिला व्हॉलिबॉल संघाचे नेतृत्व राष्ट्रीय स्तरावर करणाऱ्या स्मिता बोनकिले हिने पुणे येथून या संवादात आपले अनुभव विशद केले. क्रिकेट प्रशिक्षक सचिन मिलमिले व ३ ते ७ वर्षांच्या मुलांच्या फिटनेससंबंधी कार्य करणारे प्रा. अनंत पांडे यांनीसुद्धा याप्रसंगी आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा. डॉ. गजानन रहाटे यांनी केले. या वेब संवादामध्ये राज्यभरातून विविध खेळाडू व क्रीडा रसिक सहभागी झाले होते.

◂ *(तभा वृत्तसेवा)*

# फिटनेस फॉर स्पोर्टस अँड एकॅडमिक एक्सलंन्स या विषयावर वेब संवाद

**यवतमाळ ▪ प्रतिनिधी**

स्थानीय आबासाहेब पारवेकर महाविद्यालय, यवतमाळ व जिल्हा क्रीडा विभाग यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंती व राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्ताने ऑनलाइन वेब संवादाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मुख्य मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उदय नावलेकर लाभले होते तर प्रमुख उपस्थितीत मा. जिल्हा क्रीडा अधिकारी मुस्ताक अहमद व क्रिकेट कोच



श्री सचिन मिलमिले हे लाभले होते. ऑनलाइन वेब संवादामध्ये सुरुवातीला उपस्तीताना मार्गदर्शन करतांना मा. प्राचार्य डॉ. उदय नावलेकर यांनी भारतीय हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद यांच्या जीवनावर प्रकाश टाकला तसेच आजकालचे पालक मुलांना मैदानी खेळ खेळू न देता फक्त पुस्तकी अभ्यासावरच जास्त जोर देतात त्यामुळे मुलांचा चौफेर विकासावर मर्यादा येत असल्याचे दिसून येते असे मत व्यक्त केले.

Scanned by Scanner Go